सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : ३२१ | गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**

**आजचे भाव**

२४ सोने ९९.५०% : ₹ १५०४००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३९४००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११६०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३९०/-
भाव प्रती १० ग्राम

**आजचे अभीष्टचिंतन**



श्री. विजय पाटील
पत्रकार / अमळनेर



श्री. शुभम चौधरी
अमळनेर



श्री. संभाजी पाटील
अमळनेर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

**श्रावण सोमवारी पूजा कशी करावी? धान्याची शिवामूठ वाहण्याचा मंत्र आणि कथा**

**कोण आहे जिवती? कशी कराल जिवतीची पूजा?**

पान ४ वर

# आजपासून श्रावणपर्वाला सुरूवात; चार श्रावणी सोमवार

## महादेवांची उपासना अन् मंगळागौरीचे व्रत, काय करावे-काय टाळावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्म आणि मराठी संस्कृतीमध्ये श्रावण महिन्याला अत्यंत पवित्र आणि मंगलमय स्थान आहे. भगवान शिवजींची उपासना, विविध व्रत-वैकल्ये, धार्मिक अनुष्ठाने आणि भक्तीभावासाठी हा महिना विशेष मानला जातो. वर्षभरातील धार्मिक महिन्यांमध्ये श्रावणाला विशेष महत्त्व असल्याने शिवभक्तांसह महिला आणि भाविकांकडून या महिन्याची आतुरतेने प्रतीक्षा केली जाते.

पंचांगानुसार यंदा श्रावण महिन्याला गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ पासून प्रारंभ होत असून शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी श्रावण महिन्याची सांगता होणार आहे. या कालावधीत भगवान महादेवांची विशेष पूजा-अर्चा केली जाते. तसेच शिवलिंगावर जलाभिषेक, बेलपत्र अर्पण, मंत्रजप आणि उपवास यांसारख्या धार्मिक प्रथा भाविकांकडून श्रद्धेने पाळल्या जातात.

यंदाच्या श्रावण महिन्यात चार श्रावणी सोमवार येणार आहेत. त्यामुळे शिवभक्तांसाठी हा कालावधी विशेष महत्त्वाचा ठरणार आहे. श्रावणी सोमवारच्या दिवशी अनेक भाविक उपवास करतात, मंदिरांमध्ये जाऊन शिवलिंगाचे दर्शन घेतात आणि अभिषेक करतात.

**श्रावणात महादेवांची उपासना कशी करावी?**

श्रावण महिन्यात भगवान महादेवांची भक्तिभावाने उपासना करण्याला विशेष महत्व आहे.

पान २ वर...



### राग, वादविवाद आणि नकारात्मक विचारांपासून दूर राहण्याचा संदेश

श्रावण हा केवळ धार्मिक विधींचा महिना नसून संयम, सात्त्विकता आणि आत्मचिंतनाचा काळ मानला जातो. त्यामुळे कोणाविषयीही अपशब्द न बोलणे, विनाकारण राग न करणे, वादविवाद टाळणे आणि घरात शांततापूर्ण वातावरण ठेवणे यावर भर दिला जातो. मन शांत ठेवणे, गरजू व्यक्तींना मदत करणे, दानधर्म करणे आणि भक्तीभावाने देवाची उपासना करणे, या गोष्टींना श्रावणात विशेष महत्त्व आहे. त्यामुळे धार्मिक विधींसोबतच चांगले आचरण आणि सकारात्मक विचार ठेवण्याचा संदेशही या महिन्यातील परंपरांमधून दिला जातो.

### श्रावणात कोणत्या गोष्टी टाळाव्यात?

श्रावण महिन्यात धार्मिक श्रद्धेनुसार काही गोष्टी टाळण्याची परंपरा आहे. या काळात मांसाहार, मद्यपान तसेच तामसिक आहार टाळावा, अशी धार्मिक मान्यता आहे. अनेक भाविक कांदा आणि लसूण यांचे सेवनही या काळात टाळतात. पावसाळ्यात साथीचे आजार आणि दूषित अन्न-पाण्यामुळे होणाऱ्या आरोग्यविषयक समस्या वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे अन्नपदार्थांची स्वच्छता आणि आहाराची गुणवत्ता याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. मात्र, कोणताही आहार किंवा उपवास आरोग्याच्या स्थितीनुसारच करावा. धार्मिक मान्यतेनुसार श्रावण महिन्यात दाढी करणे, केस आणि नखे कापणे टाळण्याची प्रथाही काही ठिकाणी आढळते. या प्रथा प्रदेश, कुटुंब आणि परंपरेनुसार वेगवेगळ्या असू शकतात.

### मंगळागौरीच्या पूजेलाही विशेष महत्त्व

श्रावण महिन्यातील मंगळवार हा विशेषतः महिलांसाठी महत्त्वाचा मानला जातो. नवविवाहित महिला मंगळवारी मंगळागौरीची पूजा आणि व्रत करतात. महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेत मंगळागौरीच्या व्रताला विशेष स्थान आहे. या निमित्ताने महिला पारंपरिक पद्धतीने पूजा करतात, विविध धार्मिक विधी पार पाडतात आणि कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात. त्यामुळे श्रावण महिन्यातील सोमवार आणि मंगळवार या दोन्ही दिवसांना विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त होते.

## विषयांची सेंच्युरी असलेली अमळनेर नगर परिषदेची सर्वसाधारण सभा

# मुख्याधिकाऱ्यांच्या संदिग्ध टिपणीच्या विषयाला 'शविआ'ने केला विरोध

## वादग्रस्त विषयांवरून सभागृहात झाली जोरदार खडाजंगी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील नगर परिषदेची सर्वसाधारण सभा क्र. ४ नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी नगर परिषदेतील सभागृहात झाली. अवघ्या ६५ मिनिटांच्या या सभेत तब्बल १०० विषयांना मंजुरी देण्यात आली. मात्र, त्यातील सुमारे ५० मिनिटे शविआचे नगरसेवक डॉ. डिगंबर महाले यांनी मुख्याधिकारीयांच्या मनमानी विरोधात प्रखर शाब्दिक आक्रमण केले. त्यावरून सभागृहात जोरदार खडाजंगी झाली.

सभेच्या प्रारंभी विविध कारणांनी निधन झालेल्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. वाढदिवस असलेल्या सदस्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. डिगंबर महाले यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. शहरातील विकासकामे, रस्ते व गटारींचे कॉंक्रिटीकरण, पाणीपुरवठा, पथदिवे, स्मशानभूमी, सुशोभीकरण, भुयारी गटार योजना, आपत्ती व्यवस्थापन तसेच विविध शासकीय योजनांशी संबंधित तब्बल १०० विषयांवर चर्चा होऊन सर्व विषयांना मंजुरी देण्यात आली. नगर परिषद कर्मचारी बागूल यांच्याकडील मिळकत विभागाचा पदभार काढून घेण्याच्या विषयावरून सभेत जोरदार खडाजंगी झाली. कोणत्या व्यापाऱ्यांनी तक्रारी केल्या, असा प्रश्न नगरसेवक डॉ. महाले यांच्याकडून उपस्थित करण्यात आला. त्यावर अनिल महाजन व पंकज चौधरी यांनी हा विषय सभेच्या कामकाजातील नसल्याचे सांगत कामकाज पुढे सुरू ठेवण्याची सूचना केली. त्यावर डॉ. महाले यांनी "माझा आवाज दाबू नका, महागात पडेल," असा इशारा दिल्याने काही काळ सभागृहातील वातावरण चांगलेच तापले. काही विषय अध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांनाही माहिती नसतात. तसेच प्रशासनात आपसांत समन्वयाचा अभाव असल्याचेही डॉ. महाले यांनी नमूद केले. डॉ. महाले यांनी सर्वप्रस्तावित बांधकाम प्रकरणी अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार निधी उपलब्ध आहे का? मुख्याधिकारी यांच्या विशेषनिहाय टिपणी स्वयंस्पष्ट नाही त्यात कायद्ययाच्यात तरतूदीनाहीत त्याअभावी चूकीचा ठराव पारित झाल्यास त्याचे दायित्त्व नगरसेवकांवर येईल. त्यामुळे ज्याविषयांची टिपणीत सभेने निर्णय घ्यावा असे नमूद आहे त्या सर्व विषयांना शविआच्या सर्वसदस्यांचा विरोध आहे. मागील सभेंमध्ये आम्ही विरोध केलेले विषय देखील प्रोसेडिंगमध्ये ठराव सर्वानुमते मंजूर असे नमूद आहे. त्यामुळे आता आम्ही लेखी स्वरुपात विरोध नोंदवित आहोत. मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना डॉ. महाले यांनी अनेक प्रश्न विचारून चांगलेच बेजार केले होते. मुख्याधिकाऱ्यांना स्पष्टीकरण देताना नाकीनऊ आले होते. थातुरमातूर उत्तरे देऊन त्यांनी वेळ मारून नेली.

सभेत डॉ. महाले, अनिल महाजन, पंकज चौधरी, प्रशांत निकम, श्रीराम चौधरी, सौ. योगीताताई कापडणीस, राजूभाऊ फाफोरेकर, कैलास पाटील, दादा पवार यांच्यासह नगरसेवकांनी विविध विषयांवरील चर्चेत सहभाग घेतला. नगरसेवक, नगरसेविका तसेच पालिका कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेचे कामकाज उपमुख्याधिकारी रवींद्रकुमार चव्हाण, नगर अभियंता सचिन गवांदे, लेखापरीक्षक कृणाल कोष्टी, लेखापाल सुदर्शनराज शामनानी, विद्युत अभियंता कुणाल महाले, सहाय्यक करनिरीक्षक लौकिक समशेर, उपनगर अभियंता अजीत लांडे, संगणक अभियंता संदीप पाटील, वैद्यकीय अधिकारी विलास महाजन, अग्नीशमन अधिकारी गणेश गोसावी व सभा लिपिक प्रमोद लटपटे यांनी पाहिले. अखेरीस अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांवरही चर्चा झाली.

डॉ. महाले यांनी पूरग्रस्तांसाठी स्वतंत्र आपत्कालीन निधीची तरतूद करावी हेडबजेटमध्ये ही बाब समाविष्ट करावी तशी सुधारणा अंदाजपत्रकात करून निधीची तरतूद त्वरीत करावी त्यातून उपाययोजना व नुकसानभरपाई देण्यासाठी नियम करावे. तसेच अतिवृष्टीमुळे ज्यांचे मोठे नुकसान झाले आहे त्यांना मालमत्ता कर व पाणीपट्टी माफ करावी किंवा मोठी सवलत द्यावी यासाठी शासकीय पंचनाम्यांचा आधार घ्यावा. कोणत्याही जातीधर्माच्या नागरिकांनी त्यांच्या जातीधर्मांतील महापुरुष किंवा साधूसंतांच्या स्मारक तथा प्रतिमा उभारणीची मागणी केल्यास ती मंजूरच करावी आदी मुद्दे अत्यंत आक्रमक रित्या मांडले. शहरातून वाहणारे नैसर्गिक नाले व ओढ्यांचे संरक्षण, त्यावरील अतिक्रमणे हटविणे आणि भविष्यात पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी

पान २ वर







*अमळनेर : येथील नगर परिषदेच्या मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत विविध विषयांवर आक्रमकपणे भूमिका मांडताना नगरसेवक डॉ. डिगंबर महाले. समोर नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे. दुसऱ्या छायाचित्रात डॉ. महाले यांची 'व्हॉईस ऑफ मीडिया'च्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर व मुख्याधिकारी शिंदे.*



*नगरसेविका सौ. रूपालीताई शिवदे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर. शेजारी नगरसेविका.*

### सुरूवात खडाजंगीने, समारोप मैत्रीने!

सभेनंतर नगराध्यक्ष डॉ.परीक्षित बाविस्कर यांच्या दालनात सत्ताधारी व विरोधी गटातील काही नगरसेवकांची एकत्रित मैत्रीपूर्ण बैठक झाली. यापुढे वादाचे प्रसंग येऊ नयेत, यासाठी सभेपूर्वी सर्वांची एकत्रित मीटिंग घ्यावी, सर्वांची विकासकामे व्हावीत, असे सर्वानुमते ठरले. त्याचप्रमाणे पालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी सर्वांनी ॲक्शन प्लॅन तयार केला. त्यावर महिनाअखेरपर्यंत विशेष सभा घेण्याचे ठरले. शहरातील विकासकामे आणि त्याचप्रमाणे अतिवृष्टी व पुरासारख्या समस्या उद्भवल्यास त्यांचे निराकरण कसे करावे याबाबतही अत्यंत साधक-बाधक चर्चा झाली. आर्किटेक चेतन सोनार यांनी नुकत्याच झालेल्या पूर परिस्थितीचा आढावा व्हिडिओ क्लिपच्या माध्यमातून यावेळी उपस्थितांना दाखवला. ही बैठक सुरू असतानाच माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्याशीही नगरसेवक डॉ. महाले व पंकज चौधरी यांची मैत्रीपूर्ण चर्चा झाली. यापुढे आता पालिकेतील सर्व संघर्ष थांबतील. तसेच सत्ताधारी आणि विरोधक असा कोणताही गट राहणार नाही, याची काळजी घेण्याचे सर्वांनी ठरवले. यापुढे पालिकेतील कारभार एकदिलाने, एकमताने व एकजुटीने करण्याचे ठरले. परिणामी सभेत कितीतरी गरमागरमी झाली तरी त्याचा शेवट मात्र अत्यंत गोड आणि मैत्रीपूर्ण झाला. भरपूर हास्यविनोदही या बैठकीत झाले. आता नागरिकांना विकासकामांसाठी या एकजुटीचा आणि एकदिलाचा निश्चितपणे फायदा होईल. पालिका प्रशासनावरही त्याचा चांगला परिणाम झालेला पाहावयास मिळेल.

### पाणीपुरवठा, पथदिवे आणि भुयारी गटार योजनेला मंजुरी

पाणीपुरवठा विभागातील विविध कामे, जलकुंभ उभारणीसाठी पीएमसी नियुक्ती, उन्हाळ्यातील पाणीटंचाईवर उपाययोजना, मागणीनुसार वैयक्तिक नळजोडण्या तसेच शहरातील भुयारी गटार योजना पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याच्या विषयांना मंजुरी देण्यात आली. शहरातील पथदिव्यांसाठी सौरऊर्जेवर आधारित सुविधा, आवश्यक ठिकाणी नवीन पथदिवे आणि देखभालीसाठी मोटराइज्ड शिडी वाहन घेण्याबाबतही निर्णय घेण्यात आला. विविध प्रभागांतील रस्ते व गटारींचे कॉंक्रिटीकरण, नवीन पाण्याची टाकी, खुल्या भूखंडांचा विकास, पेव्हर ब्लॉक, चौकांचे सुशोभीकरण आदी कामांनाही मंजुरी देण्यात आली.

### सर्व महापुरुषांच्या पुतळा व स्मारक निर्मितीला मंजूरी

संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या स्मारकासाठी सहा महिन्यांपासून मागणी करूनही लक्ष दिले जात नसल्याचा आरोप नगरसेवक डॉ. महाले यांच्याकडून सभेत करण्यात आला. त्यावर नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर यांनी हा विषय आपल्याला आदल्या दिवशीच माहिती झाल्याचे सांगितले. चर्चेनंतर संत रोहिदास महाराजांचे स्मारक उभारण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. बोरी नदीपात्रात विठ्ठल माऊली स्मारकासह सुशोभीकरण, बसस्थानक परिसरात महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले स्मारक तसेच सुभाष चौकात छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारण्याबाबतही सभेत चर्चा झाली.

### पालिका शाळांना 'सीबीएसई पॅटर्न'च्या सुविधा

नगर परिषद शिक्षण कराच्या माध्यमातून एक कोटी रुपये वसूल करते, मग ते जातात कुठे? असा प्रश्न सभेत उपस्थित करण्यात आला. तसेच नगर परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी विशेष लक्ष देण्याचा मुद्दा शिक्षण सभापती नाविद शेख यांनी मांडला. पालिका शाळांमध्ये दर्जेदार शिक्षणासोबत पुरेशा सुविधा, बाके, पिण्याचे पाणी आदींची आवश्यकता असून सुविधांच्या अभावामुळे अनेक पालक खासगी शाळांकडे वळत असल्याचे त्यांनी सांगितले. पालिका शाळांमध्ये 'सीबीएसई पॅटर्न' किंवा त्याच धर्तीवरील आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्यास विद्यार्थ्यांची संख्या वाढण्यास मदत होईल. यावर डॉ. महाले यांनी सर्व नगरसेवकांनी पाळीपाळीने याशाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ म्हणून रोज गोड पदार्थ द्यावेत. सदर शाळेला काही मदत लागल्यास सर्व नगरसेवकांनी एकत्रित रित्या त्यासाठी योगदान द्यावे असे आवाहन केले.

## संपादकीय

# डिजिटल क्रांतीचा उलटफेर


गेली काही वर्षे 'डिजिटल इंडिया' मोहिमेचा गाजावाजा करून कोट्यवधी भारतीयांना ऑनलाइन पेमेंटची सवय लावल्यानंतर आता चोरपावलांनी त्यावर शुल्क आकारणीचा घाट सरकारने घातला आहे. विद्यार्थ्यांवरील लाठीमार आणि पेपरफुटीसारख्या मुद्द्यांवर संसदेत गदारोळ सुरू असतानाच सरकारने संसदेत कर आकारणी व इतर कायदे (दुरुस्ती)२०२६ हे विधेयक हळूच विनाचर्चा संमत करवून घेतले आहे. अगदी भाजी विक्रेत्यांपासून कोट्यधीशांपर्यंत सर्वत्र सवयीचे झालेल्या 'युनिफाइड पेमेंट इंटरफेस'च्या (यूपीआय) व्यवहारांवर शुल्क लागू करण्याचे अधिकार त्यातून सरकारला मिळाले आहेत. हे शुल्क कोणत्या दराने आणि कोणावर लागू होणार, हे अद्याप निश्चित झालेले नाही; तसेच सध्या त्याचे प्रमाण अत्यल्प असून दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या व्यापारी व्यवहारांवरच ते आकारण्यात येईल, अशी चर्चा आहे. मात्र, व्यापाऱ्यांकडून या शुल्काचा बोजा अंतिमतः ग्राहकांवरच पडणार आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

अनेक वर्षे देशात डेबिट आणि क्रेडिट कार्डांवर 'मर्चंट डिस्काउंट रेट'ची (एमडीआर) आकारणी करण्यात येत असे. सन २०१६ मध्ये नोटाबंदी केल्यानंतर ऑनलाइन व्यवहारांना देशात चालना मिळाली. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हरेक प्रयत्न झाले. मात्र, सन २०२० मध्ये या 'यूपीआय' व्यवहारांवरील 'एमडीआर' रद्द करणे, हा या डिजिटल व्यवहारांना गती देण्यातील सर्वांत महत्त्वाचा निर्णय ठरला. त्याबरोबरच 'क्यूआर कोड' स्कॅन करून पैसे देण्याची सुलभ सुविधा सर्वसामान्यांच्या हाती आल्यामुळे ऑनलाइन व्यवहारांची क्रांती झाली. गेल्या वर्षी देशात २४ हजार १६१ कोटी ही 'यूपीआय' व्यवहारांची संख्या, हे ही व्यवस्था तळागाळापर्यंत झिरपल्याचे निदर्शक आहे. आता या व्यवहारांवर शुल्काचा बडगा उगारण्यात आला आहे. 'यूपीआय' सेवा पुरवणे, त्यासाठी पायाभूत सुविधा आणि या सेवा सक्षम करण्यासाठी येणारा खर्च सध्या संबंधित बँका आणि सेवा पुरवठादारांकडून केला जातो व त्यावर सरकारकडून काही प्रमाणात अनुदान दिले जाते. रिझर्व्ह बँकेकडून अप्रत्यक्षपणे या शुल्काचे समर्थन करण्यात येत असून, अर्थमंत्री किंवा सरकारच्या वतीने यावर अद्याप भाष्य नाही. त्यामुळे संभ्रम कायम आहे. सध्या दोन हजार रुपयांवरील व्यापारी व्यवहारांवर एका टक्क्याहून कमी शुल्क लागू होऊ शकते, असे 'सूत्रे' सांगत आहेत.

प्रारंभी नोटबंदी करून रोख व्यवहारांच्या नाड्या आवळणे, नंतर रोख व्यवहारांवर मर्याता आणि एटीएम व्यवहारांवर शुल्क आकारणी, ही डिजिटल व्यवहारांसाठी अघोषित सक्तीच होती, आता त्यावरही शुल्काची आकारणी अयोग्यच आहे. अमेरिका व चीनसारख्या देशांत अशा शुल्कांमुळे नागरिक पुन्हा रोखीकडे वळल्याचा इतिहास आहे; भारतातही काही पाहण्यांमध्ये असे शुल्क लागू झाले, तर 'यूपीआय' बंद करू,' असे ७३ टक्के ग्राहक म्हणतात, याची दखल सरकारने घेतली पाहिजे. आधीच किमान शिलकीचा दंड, डेबिट कार्डांवर वार्षिक शुल्क, एटीएम व्यवहारांवर शुल्क, चेकबुक शुल्क, चेक बाउन्स दंड यापासून खाते बंद करण्यावरही शुल्क आकारणी, या बँकांच्या नफेखोरीला ग्राहक वैतागले आहेत, त्यात ही नवी भर. गेल्या वर्षी रिझर्व्ह बँकेने आपल्या नफ्यातून सरकारला दोन लाख कोटी रुपये लाभांश दिला, त्या तुलनेत ही शुल्क वसुली म्हणजे दात कोरून पोट भरण्याचाच प्रकार झाला. त्यामुळेच या शुल्काबाबत सरकारने जनतेला विश्वासात घेऊन त्याचा भार सर्वसामान्य ग्राहकांवर पडणार नाही, याची स्पष्ट हमी दिली पाहिजे.

# श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामींची आज जयंती

श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी यांचा जन्म १३ ऑगस्ट १८५४ रोजी माणगाव (सावंतवाडी) येथे अग्निहोत्री कऱ्हाडे ब्राह्मण कुटुंबात झाला. रमाबाई आणि गणेशभट्ट टेंबे आई-वडील होते. बालपणापासूनच ते प्रगल्भ बुद्धिमत्तेचे आणि तेजस्वी वक्तृत्वाचे होते. वयाच्या १२ व्या वर्षी त्यांनी वेदांचा सखोल अभ्यास पूर्ण केला. त्यानंतर त्यांनी ' दशग्रंथी ब्राह्मण ' म्हणून प्रसिद्धी मिळविली.



प. प. वासुदेवानंदसरस्वती (टेंबे स्वामी) महाराज

**विवाह आणि साधना**

वयाच्या २१ व्या वर्षी (१८७५) अन्नपूर्णाबाईंशी श्री वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी यांचा विवाह झाला. वडिलोपार्जित दत्तभक्तीमुळे त्यांनी गुरुचरित्र वाचन, गायत्री पुरश्चरण आणि ज्योतिष अभ्यास केला. पत्नीच्या निधनानंतर (१८९१) त्यांनी संन्यास स्वीकारला. गुरू गोविंदस्वामी (नरसिह सरस्वती) यांच्याकडून मंत्रदीक्षा आणि श्री नृसिंह सरस्वती स्वामींकडून संन्यास दीक्षा मिळाली.

**कार्य आणि योगदान**

श्री वासुदेवानंद स्वामींनी श्री दत्तात्रेयांच्या आज्ञेनुसार माणगाव येथे दत्त मंदिर स्थापन केले (१८८३) आणि सात वर्षे उपासना केली. त्यांनी भारतभर पायी प्रवास करून दत्तभक्तीचा प्रसार केला. त्यांच्या ग्रंथरचनांमध्ये दत्त माहात्म्य, दत्त पुराण, शिक्षात्रयम, सप्तशती गुरुचरित्र, करुणात्रिपदी यांसारखे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांनी नृसिंहवाडी, गाणगापूर, पिठापूर, कारंजा येथे दत्तोपासनेची पुनर्स्थापना केली.

**उपदेशाचे सार**

मन, बुद्धी आणि कर्म शुद्ध ठेवावे. गुरुभक्ती, शास्त्रनिष्ठा आणि आत्मानुभवाने मोक्ष साधावा. विवेक, वैराग्य आणि भगवद्भक्तीने आध्यात्मिक प्रगती करावी. कर्म, भक्ती, ज्ञान आणि योग हे मोक्षाचे मार्ग आहेत.

**जीवन आणि समाधी**

श्री वासुदेवानंद स्वामींनी भारतभर विशेषतः महाराष्ट्र, उत्तर भारत आणि गुजरातमध्ये २३ चातुर्मास केले. नर्मदाकाठ आणि नृसिंहवाडी येथे त्यांचे कार्य मोठे आहे. २४ जुलै १९१४ रोजी गरुडेश्वर येथे आषाढ शुद्ध प्रतिपदेस त्यांनी समाधी घेतली. तेथे त्यांचे समाधी मंदिर आहे.

**शिष्य**

श्री रंग अवधूत, श्री गांडा महाराज, योगीराज गुळवणी महाराज, श्रीपाद दत्तात्रेय देशपांडे (मामासाहेब) हे त्यांचे प्रमुख शिष्य.

**वैशिष्ट्य :** श्री वासुदेवानंद स्वामी हे दत्तभक्तीचे जाज्वल्य प्रतीक होते. त्यांची मंत्रगर्भ रचना, प्रगल्भ विद्वत्ता आणि करुणामय स्वभाव यामुळे ते भक्तांमध्ये आदरणीय आहेत. श्रृंगेरी शंकराचार्यांनी त्यांना गुप्तरूपातील आद्य शंकराचार्य, असे संबोधले. त्यांचे वाङ्मय आणि कार्य आजही दत्तभक्तांना प्रेरणा देते.

# श्री वरदलक्ष्मी व्रत म्हणजे काय? कधीपासून या व्रताला प्रारंभ करावा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री वरदलक्ष्मी ही देवता ऐश्वर्याची आहे. या व्रताने धन, संपत्ती वैभव प्राप्त होते. पुराणामध्ये आदिशक्ती, जगदंबेचे रूप लक्ष वेधून घेणारे असे वर्णन आहे. विविध अवतार जगदंबेने धारण केले त्यातील एक रूप म्हणजे लक्ष्मी. आपल्या भक्तांना वर देऊन सुख-समृद्धी, वैभव मुक्तहस्ते प्रदान करते. देवादिकांनी आणि ऋषिमुनींनी सुद्धा 'श्री वरदलक्ष्मी' म्हणून तिची स्तुती केली आहे. या वरदलक्ष्मीची मनोभावे भक्ती करणाऱ्यांच्या घरामध्ये धनधान्य यांची समृद्धी होऊन संतती भाग्यशाली बनेल, असे श्री वरदलक्ष्मी देवींचे वचन आहे. ज्यावेळी श्रावण महिन्यात पौर्णिमेला शुक्रवार येतो त्या पौर्णिमेपासून या व्रताला प्रारंभ करावा

**वरदलक्ष्मी व्रत कथा**

एकदा कैलासावर भगवान शिवजी-माता पार्वती सारीपाट खेळत होते. त्यावेळी एक डाव कोणी जिंकला याबद्दल त्या दोघांमध्ये वाद निर्माण झाला. अखेर तिथे उपस्थित असलेल्या चक्रनेमी नावाच्या आपल्या गणाला भगवान शिवशंकरांनी निर्णय विचारला असता त्याने भगवान शिवशंकरांच्या बाजूने निर्णय दिला. त्यावेळी रागावलेल्या माता पार्वतींनी त्या गणाला 'तू कुष्ठरोगी होशील' असा शाप दिला. परंतु शिवजींनी त्याचा निर्णय योग्य होता हे पार्वतींच्या लक्षात आणून दिले. तसेच त्याला उःशाप देण्यास सांगितले. तेव्हा माता पार्वतींनी 'एका सरोवराच्या काठावर काही देवस्त्रिया वरदलक्ष्मीचे व्रत करीत असतील. त्यांना विचारून चक्रनेमीने ते व्रत केल्यास तो रोगमुक्त होईल, असे सांगितले. त्याप्रमाणे चक्रनेमीने एका सरोवराच्या काठी वरदलक्ष्मीचे व्रत करणाऱ्या देवस्त्रियांना त्या व्रताबद्दलची माहिती विचारून हे व्रत केले. परिणामी तो रोगमुक्त झाला.

**पूजा विधी**

एका चौरंगावर कापड पसरवून त्यावर तांदूळ घालून त्यावर कलश स्थापना केली जाते. त्यावर ताह्मण ठेवून ताह्मणाच्या



मध्यभागी चतुर्भुज वरदलक्ष्मी देवींची प्रतिमा किंवा मूर्ती ठेवून तिची सोळा उपचारांनी पूजा केली जाते. देवीला २१ प्रकारची पत्री अर्पण करून २१ अनारसे, २१ वडे, घारगे किंवा मोदक इत्यादी पदार्थांचे नैवेद्य दाखविले जातात. आरती मंत्रपुष्प म्हणून पुण्य प्राप्त करून देणारी अशी कथा भक्तिभावाने श्रवण करावी. सुवासिनीची खणानारळाने ओटी भरावी. दुसऱ्या दिवशी सकाळी दही-भाताचा नैवेद्य दाखवावा. नंतर विसर्जन करावे.

**वैभवलक्ष्मी व्रतासंबंधीचे नियम**

१) सौभाग्यवतींनी हे व्रत केल्यास त्याचे उत्तम फळ मिळते. घरांत सौभाग्यवती स्त्री नसेल तर कोणतीही स्त्री किंवा कुमारिका हे व्रत करून शकते.

२) स्त्री ऐवजी पुरुषाने जर हे व्रत केले तर त्याचे उत्तम फळ अवश्य मिळते.

३) हे व्रत श्रद्धेने आणि पवित्र भावनेने करायचे असते. मनात नसेल तर किंवा कंटाळून हे व्रत करू नये.

४) व्रत करण्याकरिता ११ किंवा २१ शुक्रवार नक्की करावेत आणि या पुस्तकांत सांगितल्याप्रमाणे शास्तोक्त विधीपूर्वक व्रत करावे. ठरविलेले शुक्रवार पुरे झाले की विधीप्रमाणे आणि शास्त्रोक्त रीतीने समारंभपूर्वक त्याची उद्यापन करावे. हा विधी अगदी सोपा आहे. पण विधीपूर्वक शास्त्रोक्त पद्धतीने जर व्रत केले नाही तर त्याचे किंचीतही फळ मिळत नाही.

५) एकदा व्रत पूर्ण झाले की पुन्हा त्याचा संकल्प सोडून पुन्हा ते व्रत करू शकतो.

६) माता लक्ष्मींची अनेक स्वरूपे आहेत. तसेच माता लक्ष्मीला 'श्रीयंत्र' अतिप्रिय आहे. त्यातील धनलक्ष्मी स्वरूप ही वैभवलक्ष्मीच आहे. व्रत करताना या पुस्तकात दिलेल्या माता लक्ष्मींच्या प्रत्येक स्वरूपाला वंदन करावे आणि 'श्रीयंत्रा'लाही वंदन करावे. तरच त्याचे फळ मिळते. इतकीही आपण तसदी घेतली नाही तर माता लक्ष्मीही आपल्याकरिता तसदी घेणार नाहीत व त्यांची कृपा आपल्यावर होणार नाही.

७) व्रताच्या दिवसांत सकाळपासूनच 'जय लक्ष्मी माता,' 'जय लक्ष्मी माता' असा जप मनातल्या मनात जितक्या वेळा करता येईल तितक्या वेळा करावा.

८) एखाद्या शुक्रवारी बाहेर किंवा प्रवासाला जावे लागले तर तो शुक्रवार सोडून पुढच्या शुक्रवारला व्रत करावे. पण व्रत स्वतःच्या घरीच करावे. एकूण जितक्या शुक्रवारांचा संकल्प केला तितके व्रताचे शुक्रवार पूर्ण करावेत.

९) घरात सोने नसेल तर चांदीची वस्तू पूजेला ठेवावी. तीही नसेल तर रुपयाचे नाणे ठेवावे.

१०) व्रत पुरे झाल्यावर सात भगिनींना किंवा ११, २१, ५२, १०१ भगिनींना 'वैभवलक्ष्मी व्रताचे' शास्त्रोक्त विधी सांगणारे पुस्तक भेट म्हणून द्यावे. जितक्या अधिक पुस्तकांची भेट द्याल तितकी अधिक माता लक्ष्मींची तुमच्यावर कृपा होईल आणि त्याबरोबर लक्ष्मीमाता व्रताचा अधिक प्रचार होईल.

११) व्रताच्या शुक्रवारी मासिकपाळीची अडचण असेल किंवा सुतक असेल तर तो शुक्रवार सोडून द्यावा आणि नंतरचा शुक्रवार धरावा पण जितक्या शुक्रवारांचा संकल्प केला असेल तेवढे शुक्रवार पूर्ण करावेत.

१२) व्रताची सुरूवात करताना लक्ष्मीस्तवनाचा पाठ एकदा म्हणावा.

१३) व्रताच्या दिवशी शक्य झाल्यास उपवास करावा आणि सायंकाळी व्रताचा विधी झाल्यावर मातेचा प्रसाद घेऊन शुक्रवार करावा. उपवास कारायचा नसेल तर फलाहार घ्यावा किंवा एक वेळा जेवण करून शुक्रवार करावा. जर व्रतधारी अशक्त असेल तर दोन वेळ जेवण घ्यावे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही आहे की व्रतधारकांनी माता लक्ष्मी वर पूर्ण श्रद्धा आणि भावना ठेवावी आणि 'माझी मनोकामना माताजी पूर्ण करील' असा दृढ संकल्प करावा.

# साळीवाडा मित्रमंडळातर्फे आजपासून शिवपुराण कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : श्रावण महिन्यानिमित्त साळीवाडा मित्रमंडळातर्फे गुरुवार, दि. १३ ते १९ ऑगस्ट २०२६ दरम्यान शिवपुराण कथेचे आयोजन केले आहे. साळीवाड्यातील जय हो हॉलमध्ये दररोज दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजेदरम्यान ही कथा होणार आहे. कथेचे वाचन भागवताचार्य कमलेश महाराज कुलकर्णी करणार आहेत. तबला वादक सुभाष भोरे महाराज, मुताईनगर आणि गायक व ऑर्गन वादक प्रवीण महाराज सातव, अकोला यांची यावेळी साथसंगत लाभणार आहे. या कार्यक्रमात शिवमहिमा, भगवान शंकरांची उपासना तसेच शिवपुराणातील विविध प्रसंगांचे भक्तीमय निरूपण करण्यात येणार आहे. परिसरातील सर्व शिवभक्त व भाविकांनी कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## आजपासून श्रावण

पान १ वरून : दररोज किंवा विशेषतः सोमवारी शिवलिंगावर पाणी, दूध आणि बेलपत्र अर्पण करण्याची धार्मिक परंपरा आहे. 'ॐ नमः शिवाय' या पंचाक्षरी मंत्राचा जप तसेच महामृत्युंजय मंत्राचे पठण करण्याची प्रथा अनेक भाविकांमध्ये आहे. या काळात सात्त्विक आणि हलका आहार घेण्यावरही भर दिला जातो. पावसाळ्यात वातावरणातील बदलांमुळे अनेकदा पचनक्रिया मंदावू शकते. त्यामुळे आहाराबाबत संयम राखणे आणि स्वच्छ, ताजे व पचण्यास सुलभपदार्थांचे सेवन करणे आरोग्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकते. धार्मिक श्रद्धेनुसार उपवासालाही या काळात विशेष महत्त्व आहे. श्रावणात केवळ देवपूजा आणि व्रत-वैकल्येच नव्हे, तर दानधर्मालाही महत्त्व दिले जाते. गरजू व्यक्तींना अन्न, वस्त्र, छत्री, चपला किंवा आवश्यक वस्तूंचे दान करावे, अशी धार्मिक परंपरा आहे. आपल्या क्षमतेनुसार गरजू व्यक्तींना मदत करणे आणि समाजोपयोगी कार्यात सहभागी होणे हेही या महिन्यात पुण्यकारक मानले जाते.

## तरी १०० विषयांना दिली मंजुरी!

उपाययोजना करण्याबाबतही यावेळी चर्चा झाली. मुख्याधिकारी शिंदे यांनी प्रशासनातर्फे याबाबत आवश्यक नियोजन व कार्यवाही केली जात असल्याचे सांगितले. महापुराचे पाणी शहरातील अनेक भागांत शिरल्याच्या पार्श्वभूमीवर नगरसेविका सौ. कापडणीस यांनी या विषयावर सविस्तर चर्चा करण्याची मागणी केली. पिंपळे रोड तसेच ढेकू रोडवरील डीपी रस्त्यांवरूनही पाणी शहरात आले. त्यामुळे या मार्गांवरील पाण्याचा निचरा व पूरप्रतिबंधक उपाययोजनांचे नियोजन करण्याची मागणीही त्यांनी केली. डीपी रस्त्यांच्या कामावर सदस्यांची नाराजी शहर विकास आराखड्यातील डीपी रस्त्यांच्या कामाबाबतही सभेत नाराजी व्यक्त करण्यात आली. संबंधित ठेकेदाराकडून काम पूर्ण करण्यास विलंब होत असून, कामात अनेक त्रुटी असल्याचा मुद्दाही उपस्थित झाला. रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना गटारींची व्यवस्था करावी, कामातील त्रुटी दूर करून काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. कामाला मुदतवाढ देऊन ठेकेदाराला एकप्रकारे अभय देण्यात आले असल्याचे दिसत असल्याची नाराजीही व्यक्त करण्यात आली. सर्व रस्त्यांची कामे दर्जेदार व सुरक्षित पद्धतीने तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली.

**'लाडकी बहीण हॉस्पिटल'चा मानस :** महिलांसाठी 'लाडकी बहीण हॉस्पिटल' सुरू करण्याचा मानस असल्याचे नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर यांनी सभेत सांगितले. जन्म-मृत्यू दाखला तसेच कलर प्रिंटसाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कावरही चर्चा झाली. यासाठी पूर्वीप्रमाणे ५० रुपये शुल्क कायम ठेवण्यास सभेने मंजुरी दिली.

# श्रावण गुरुवारी कसे कराल देव गुरू बृहस्पतींचे पूजन?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात प्रत्येक दिवस कोणत्या ना कोणत्या देवतेला समर्पित असतो. त्याचप्रमाणे गुरुवार हा देवांचे गुरू बृहस्पती देवांचा दिवस आहे. असे मानले जाते की या दिवशी विधीपूर्वक गुरूंची पूजा केल्याने व्यक्तीच्या जीवनातील सर्व संकटे दूर होतात. घरात सुख, शांती आणि समृद्धी येते. गुरुदेवांना प्रसन्न करण्यासाठी गुरुवारी अनेकदा उपवास केला जातो. या दिवशी ब्रह्म मुहूर्तावर स्नान करून गुरुदेवांची पूजा केल्याने व्यक्तीचे भाग्य उघडते. ज्योतिषशास्त्रानुसार आठवड्यातील प्रत्येक दिवस एका विशिष्ट ग्रहाशी संबंधित आहे. त्या ग्रहाच्या देवाला त्या दिवसाचा स्वामी मानले जाते. गुरुवार हा गुरुग्रहाशी संबंधित असल्याने या दिवशी गुरुदेवांची पूजा करण्याला विशेष महत्त्व आहे. गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ हा दिवस यंदाच्या श्रावण मासातील पहिला गुरुवार असल्याने या दिवशी आपण गुरुदेवांची पूजा कशी करावी आणि या पूजेचे महत्त्व काय आहे याबद्दल सविस्तरपणे जाणून घेऊ.

**देव गुरू बृहस्पतींसाठी पूजा साहित्य**

पिवळ्या रंगाच्या वस्तू, पिवळी फुले, पिवळे चंदन, पिवळे कपडे, पिवळी फळे, शुद्ध तुपाचा दिवा, धुपाच्या काड्या, हरभराडाळ, गूळ, मनुका, गंगेचे पाणी, रोली, तांदूळ, कुमकुम, तुळशीची पाने, पाण्याने भरलेला कलश.

**देव गुरू बृहस्पतींची पूजा कशी करावी?**

सकाळी लवकर उठून स्नान करा आणि पिवळे कपडे घाला. पूजास्थळ स्वच्छ करा आणि गंगाजल शिंपडा. बृहस्पती देवांच्या मूर्तीला किंवा चित्राला गंगाजलाने स्नान घाला आणि पिवळे कपडे अर्पण करा. पिवळी फुले, फळे, मिठाई, तांदूळ, हळद, हरभरा डाळ आणि मनुका अर्पण करा. दिवा लावा आणि धूप अर्पण करा.

**बृहस्पती देवांचा मंत्रजप करा :**

'ॐ ग्रां ग्रीं ग्रौं सः बृहस्पतये नमः'

शेवटी देव गुरू बृहस्पतींची आरती करा. पूजेत हळद अर्पण करा आणि त्यानंतर कपाळावर हळदीचा टिळा लावा. असे मानले जाते, की हळदीचा टिळा लावल्याने व्यक्तीच्या लग्नातील समस्या दूर होतात.

# श्रावण : अभिजात चैतन्य आणि भावभावनांचा उत्सव!

श्रावण... शब्द ओठावर येताच मनाच्या नभांगणात इंद्रधनुष्याचे रंग उधळले जातात. हा केवळ एक महिना नव्हे, तर वसुंधरेने धारण केलेला एक लावण्यमय अलंकार आहे. ग्रीष्माच्या दाहकतेने तप्त झालेल्या धरणीवर श्रावणाने लावलेला हा गारवा म्हणजे सृष्टीचा पुन्हा एकदा नव्याने बहरलेला 'हौस-महोत्सव'च जणू. या उत्सवाची सुरूवात गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ पासून होत आहे. त्यानिमित्त...

निसर्गाच्या पसाऱ्यात श्रावण जेव्हा अलगद पदार्पण करतो तेव्हा चहूबाजूंनी हिरवाईची एक अथांग चादर ओढली जाते. मातीचा तो मधाळ, मादक, धुंद करणारा गंध, हवेत दरवळणारा ओलावा आणि ढगांच्या आडून डोकावणारा तो लपंडाव खेळणारा सूर्यहे सारेच अनाकलनीय... खरेतर मोहिनी घालणारे असते. 'क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात पिवळे ऊन पडे' असा हा रिमझिम, भुरभुरणारा, गोड आणि छान छान पाऊस पशू पक्षी झाडे झुडपे, वेली, लहानथोर प्रत्येकालाच हवाहवासा वाटतो. नद्या-नाले आता केवळ प्रवाह राहत नाहीत, तर ते खळाळणारे संगीत होऊन दगडधोंड्यांशी गुजगोष्टी करू लागतात. डोंगरदऱ्यांतून कोसळणारे धबधबे म्हणजे जणू सृष्टीने अंगावर घेतलेली शुभ्र दुग्धधवल वस्त्रे.

श्रावणाची ही किमया केवळ बाह्य सौंदर्यापुरती मर्यादित नाही; ती मानवी अंतःकरणालाही एका वेगळ्याच धुंदीत न्हाऊ घालते. कवीमनाला अधिक हळवे करणारा आणि त्याला काव्यविश्वात पूर्णपणे हरवून टाकणारा हा ऋतू आहे. इंद्रधनुष्यावर स्वार होऊन स्वप्नांच्या दुनियेत सैर करणाऱ्या प्रियकर-प्रेयसीच्या मनाला हा श्रावण पुरता मोहरून टाकतो. पावसाच्या त्या रिमझिम धारा, म्हणजे विरहाच्या वेदना विसरून मिलनाची आस धरणाऱ्या प्रेमी जिवांच्या आनंदाने ओथंबलेले आसूच जणू! जीव आणि शिव यांच्यातील अद्वैत साधण्याचा हा काळ आहे.

सजीवांच्या मनात या काळात एक विलक्षण चैतन्य जागृत होते. मोर पिसारा फुलवून जेव्हा श्रावणाचे स्वागत करतो, तेव्हा तो केवळ नाच नसतो, तर निसर्गाच्या या गाण्याला दिलेली ती एक अभिजात दाद असते. महिना-दीड महिन्यापूर्वी शेतात जतन करून पेरलेली पिके आता पोग्यात येण्याचा, म्हणजेच पिके ऐन वयात येण्याचा हा काळ! वाऱ्यावर डोलणारी ती ताजी हिरवी शेते पाहून बळीराजाच्या डोळ्यांत उद्याच्या समृद्धीची स्वप्ने फुलू लागतात. शेतकरी, कष्टकरी कामगार असो की निसर्गावर प्रेम करणारा पर्यावरणप्रेमीहा महिना प्रत्येकाच्याच



मनाला एक वेगळाच दिलासा आणि आनंद देऊन जातो.

ऋतुचक्रातील सर्वात मोहक व सौंदर्य संपन्न महिना म्हणजे श्रावण, श्रावण म्हणजे केवळ पावसाच्या धारा नव्हेत, तर ते मातीचे, पिकांचे आणि मानवी भावनांचे एकाच लयीत स्पंदन पावणे आहे. या महिन्याचे धार्मिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान तर अतीव गंभीर आहे. शास्त्रीय, धार्मिक, सामाजिक, धरेशी नाते सांगणाऱ्या व्रतवैकल्यांची मालिका म्हणजे मनाला शिस्त लावण्याचे एक माध्यम आहे. सोमवारचे उपवास, मंगळागौर, नागपंचमीहे सण म्हणजे स्त्रीशक्तीचा निसर्गाशी असलेला ऋणानुबंध दर्शवतात. आयुर्वेदाच्या दृष्टीने श्रावण हा शरीराचे 'कायाकल्प' करण्याचा काळ आहे. पावसाळ्याच्या कुंद वातावरणात मंदावलेल्या जठराग्नीची काळजी घेण्यासाठी वाडवडील यांनी विविध कारणे तोडगे सांगून घालून दिलेला आहार-विहार, हेच उत्तम आरोग्याचे गुपित आहे. कंदमुळे, सात्त्विक आहार आणि निसर्गाशी तादात्म्य पावणारी जीवनपद्धती, यातूनच तर श्रावण आपल्या शरीराला आणि मनाला नवसंजीवनी देतो.

श्रावण म्हणजे कविमनाला आणि त्यांच्या लेखणीला मिळालेली एक दिव्य प्रेरणा आहे. मनाच्या गाभाऱ्यात जन्म घेणारी शब्दांची जादुई मांडणी रिमझिम पावसात ओथंबून कागदावर उतरत जाते आणि साऱ्याना आनंद वाटत जाते... झिरपणारी, निथळणारी, बागडणारी, थुई थूई नाचत हळुवार कागदावर उतरणारी प्रत्येक कविता, या ऋतूच्या सौंदर्याचा आरसा असते. शब्दांतून न ओसंडणारे, केवळ अनुभवाच्या भाषेतून कळणारे हे 'श्रावणवेड' मानवी जीवनाला एक अनोखी मादकता बहाल करते. ही नशा कोणत्याही मादक द्रव्या पेक्षा अधिक नशिली आणि शुद्ध असतेकारण ती सृष्टीच्या मुक्त सौंदर्याची जादू असते. श्रावणाच्या या रिमझिम सरींमध्ये भिजताना आपण नकळतच स्वतःला शोधत असतो. काळ कितीही पुढे गेला, तरी श्रावणाची ही 'हिरवी जादू' आजही मनाला लहान मुलासारखे हसवते, खेळवते, फुलवते, स्वप्नाळू बनवते.

असा हा श्रावण म्हणजे निसर्गाने मानवाला दिलेली नितांत सुंदर भेट आहे. ज्यात आपण स्वतःचे अंतरंग पाहतो, जिथे सर्व काही क्षमाशील असते, जिथे सर्व काही चैतन्यमय असते. हा ऋतू म्हणजे केवळ निसर्गचक्र नसून, ते आपल्या जीवनातील मरगळ झटकून पुन्हा एकदा नव्या जिद्दीने फुलण्याचे, बहरण्याचे वसुंधरेचे निमंत्रणच आहे. श्रावण येतो आणि मनाच्या वाळवंटात पुन्हा एकदा हिरव्या स्वप्नांचे अंकुर फुटू लागतात. वर्षभराची आल्हाददायक व सकारात्मक ऊर्जा साठवून आपण श्रावणाला निरोप देतो पुन्हा श्रावण सरींची आस मनात ठेवूनच!

**– धनंजय सोनार, अमळनेर**
**मो. : ७९७२८८१४४०**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# दहा दिवसांतच मोगऱ्याचे रोप कळ्यांनी भरा!

## कुंडीत टाकून बघा 'या' ५ टाकाऊ गोष्टी; येतील भरपूर फुले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मोगऱ्याचे रोप भरपूर वाढते, पण कळ्याच लागत नाहीत म्हणून तुम्हीही त्रस्त आहात? मग स्वयंपाकघरातील काही साध्या टाकाऊ गोष्टींचा उपयोग करून मोगऱ्याचा बहर वाढविण्याचा हा घरगुती उपाय जाणून घ्या.

अंगणभर दरवळणारा मोगऱ्याचा सुगंध आणि त्याच्या पांढऱ्या पाकळ्यांचा देखणा बहर हे कोणाला आवडणार नाही? मोगरा फुलाचा सुगंध खूप मनमोहक असतो आणि तो खूप आकर्षकदेखील दिसतो. घरात मोगरा लावल्याने वातावरण सुगंधित होते. अनेक जण घराच्या बाल्कनीत, टेरेस गार्डनमध्ये आवडीने इतर फुलझाडांसह मोगऱ्याचे रोप लावतात. पण कधी-कधी मोगऱ्याचे रोप लावूनही त्यावर फूल येत नाही. त्यांची पाने, कळ्या सुकून जातात, ज्यामुळे तो कोमेजून जातो. पाणी, सूर्यप्रकाश मिळाला तरी काही फायदा होत नाही आणि मनात प्रश्न येतो "अखेर फुले का येत नाहीत?"

तुमच्या याच प्रश्नाचे उत्तर आम्ही तुमच्यासाठी घेऊन आलो आहोत. मोगऱ्याच्या रोपाचा बहर अचानक कमी झाल्याने काय करावे ते समजत नाही. पण काळजी करू



नका. मोगऱ्याला भरपूर फुले येण्यासाठी आम्ही तुमच्यासाठी उपाय घेऊन आलो आहोत. घरच्या घरी मिळणाऱ्या काही साध्या गोष्टी मोगऱ्याच्या मुळाशी टाकल्यास तो फुलांनी लगडून जाईल. खर्च जवळजवळ नाही, पण परिणाम जबरदस्त. कोणत्या गोष्टी मोगराऱ्याच्या रोपासाठी वरदान ठरू शकतात, ते आज आपण जाणून घेऊया.

### 'या' ५ गोष्टींनी मोगऱ्याचे रोप बनेल फुलांनी गच्च; कचरा होईल खजिना

**१) लसूण पाणी : फुलांसाठी जादुई टॉनिक**

लसणात असलेले अँटीफंगल आणि अँटीबॅक्टेरियल गुण मातीला पोषण देतात. लसणाच्या तीन-चार पाकळ्या ठेचून रात्रभर पाण्यात भिजत ठेवा, सकाळी ते पाणी गाळून मोगऱ्याच्या मुळाशी ओता. काही दिवसांत फरक जाणवेल.

**२) डाळीचे पाणी : घरचे नैसर्गिक खत**

डाळ धुताना जे पाणी निघते, ते कधीही वाया घालवू नका. डाळीचे ताजे पाणी थेट मोगऱ्याच्या मुळाशी टाकल्याने झाडाला भरपूर पोषण मिळते आणि कळ्या फुटायला लागतात.

**३) लाकडाची राख : पोटॅशियमचा स्रोत**

लाकडाची थोडीशी राख मोगऱ्यासाठी उपयुक्त असते; पण जास्त प्रमाण हानिकारक ठरू शकते. काळजीपूर्वक मुळाशी टाका.

**४) तांदळाचे पाणी : गुपित पोषण**

तांदूळ धुताना जे पाणी निघते, ते पातळ करून मोगऱ्याच्या मुळाशी टाका. हे पाणी झाडाच्या वाढीस आणि फुलांच्या उमलण्यास मदत करते.

**५) आंबट ताक : नैसर्गिक फर्टिलायझर**

१५-२० दिवसांच्या अंतराने पातळ आंबट ताक मोगऱ्याच्या मुळाशी टाकल्यास झाडाची फुले येण्याची क्षमता वाढते.

**माळ्यांचा सल्ला :** कोणतेही नैसर्गिक खत १५-२० दिवसांच्या अंतरानेच वापरा. जास्त प्रमाणात खत वापरल्यास झाड खराब होऊ शकते.

# २९ साल पुराने गाने के भरोसे दिया यूपीएससी इंटरव्यू

## एआयआर-१ पाने वाले अनुज अग्निहोत्री की अनोखी कहानी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

देश की सबसे कठिन परीक्षाओं में से एक, संघ लोक सेवा आयोग की सिविल सेवा परीक्षा में प्रारंभिक और मुख्य परीक्षा पास करने वाले अभ्यर्थियों को साक्षात्कार के लिए बुलाया जाता है। यूपीएससी का इंटरव्यू पास करना आसान नहीं होता। इंटरव्यू पैनल कई बार अभ्यर्थी से उसकी पसंद का गाना और उसके मायने तक पूछ लेता है। शायद यही वजह है कि यूपीएससी २०२५ के टॉपर अनुज अग्निहोत्री आज से २९ साल पुराना गाना याद करके इंटरव्यू देने गए थे।

संघ लोक सेवा आयोग की सिविल सेवा परीक्षा २०२५ में अखिल भारतीय स्तर पर पहली रैंक हासिल करने वाले अनुज अग्निहोत्री ने मीडिया को दिए एक इंटरव्यू में बताया था कि वे यूपीएससी इंटरव्यू के लिए बाकायदा एक गाना तैयार करके गए थे, ताकि इंटरव्यू पैनल द्वारा गाने के बारे में पूछे गए सवालों के जवाब दे सकें।

यूपीएससी में एआयआर-१ लाने वाले अनुज अग्निहोत्री ने बताया कि उन्हें तीसरे प्रयास में यूपीएससी में सफलता मिली। वे इससे पहले भी इंटरव्यू दे चुके थे. अनुज ने कहा कि 'मुझको भी तो लिफ्ट करा दे' मेरा पसंदीदा गाना है और मैंने यूपीएससी के इंटरव्यू के लिए इसे ही तैयार किया था। मैंने सोच रखा था कि अगर यूपीएससी इंटरव्यू में मेरे पसंदीदा गाने के बारे में पूछा गया तो मेरा जवाब होगा-'मुझको भी तो लिफ्ट करा दे'।

### कौन हैं अनुज अग्निहोत्री?

यूपीएससी सीएसई २०२५ टॉपर अनुज अग्निहोत्री मूल रूप से राजस्थान के चित्तौड़गढ़ जिले के रावतभाटा शहर के रहने वाले हैं। २६ साल की उम्र में अनुज अग्निहोत्री ने यूपीएससी २०२५ में ऑल इंडिया लेवल पर पहली रैंक हासिल की। रावतभाटा के स्कूल से पढ़ाई पूरी करने के बाद, उन्होंने साल २०१५ से २०१७ तक कोटा में रहकर तैयारी की और नीट-यूजी में सफलता हासिल की। एम्स जोधपुर से एमबीबीएस की डिग्री लेने के बाद वे यूपीएससी की तैयारी में जुट गए और ऑनलाइन पढ़ाई करके यह सफलता हासिल की। अनुज के पिता के. बी. अग्निहोत्री परमाणु बिजलीघर में टेक्नीशियन हैं व मां मंजू गृहिणी हैं। बड़ा भाई हैदराबाद में मार्केटिंग ऑफिसर है।

### १९९७ में आया था अदनान सामी का 'लिफ्ट करा दे' गाना

पाकिस्तान से ताल्लुक रखने वाले सिंगर अदनान सामी का हिट गाना 'लिफ्ट करा दे' आज से करीब २९ साल पहले १ जनवरी, १९९७ को रिलीज हुआ था। यह गाना प्रसिद्ध स्टूडियो एलबम 'कभी तो नजर मिलाओ' का हिस्सा था। बाद में साल २००० में कई अंतरराष्ट्रीय और भारतीय संगीत लेबल के माध्यम से भी इसे दोबारा रिलीज किया गया। आपको बता दें कि १५ अगस्त १९७१ को लंदन में जन्मे अदनान सामी को साल २०१६ में भारतीय नागरिकता मिली थी।



# पालक आणि पनीर एकत्र खाणे योग्य की अयोग्य?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पालक आणि पनीर ही चविष्ट डिश असली तरी पोषणाच्या दृष्टीने हे कॉम्बिनेशन तितकेसे फायदेशीर मानले जात नाही.

**लोहाचे शोषण कमी होते :** पनीरमधील कॅल्शियममुळे पालकमधील लोह शरीरात कमी प्रमाणात शोषले जाऊ शकते.

**कॅल्शियमचाही फायदा कमी :** पालकमधील ऑक्सॅलेट पनीरमधील कॅल्शियमसोबत संयोग करून त्याचे शोषण कमी करू शकते.

**पचनावर ताण येऊ शकतो :** हे दोन्ही पदार्थ काही लोकांसाठी जड ठरू शकतात, त्यामुळे गॅस किंवा ॲसिडिटीचा त्रास होऊ शकतो.



**व्हिटॅमिन सी सोबत खा :** पालक बनवताना टोमॅटो किंवा लिंबाचा वापर केल्यास लोहाचे शोषण सुधारण्यास मदत होते.

**पालक-बटाटा किंवा पालक-मका :** लोहाचा अधिक फायदा मिळवण्यासाठी पालक बटाटा किंवा मक्यासोबत खाणे चांगला पर्याय ठरू शकतो.

**चवीसाठी खायला हरकत नाही :** पालक-पनीर प्रोटीनयुक्त आणि चविष्ट आहे. मात्र, लोह आणि कॅल्शियमचा पूर्ण फायदा मिळेलच असे नाही.


**संतुलित आहार महत्त्वाचा :** पालक-पनीर खा, पण लोह आणि कॅल्शियमच्या गरजेसाठी इतर पोषक पदार्थांचाही आहारात समावेश करा.

# पावसाळ्यात पेपरवर कांदा ठेवताच झाली कमाल!

## मोठ्या समस्येवर उपाय काय ते व्हिडिओमध्ये पाहाच!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात गृहिणींकडे काही ना काही किचन जुगाड असतात. ज्यामुळे आपली बरीच डोंगराएवढी मोठी वाटणारी कामे कधी-कधी किचनमधल्याच वस्तूंनी चुटकीशीर होऊन जातात. एका गृहिणीने खास महिलांसाठी आज असाच एक हटके आणि टेन्शन दूर करणारा जबरदस्त असा किचन जुगाड दाखवला आहे. गृहिणींनो तुम्ही कधी पेपरवर कांदा ठेवला आहे का? आता तुम्ही म्हणाल कांदा आणि पेपरवर कशाला ? मात्र थांबा पावसाळ्यात याचा मोठा फायदा आहे. तुम्हाला हा उपाय जितका विचित्र वाटतो आहे त्यापेक्षा कितीतरी जास्त तो फायद्याचा आहे. मात्र, नेमकी कमाल काय होते हा प्रश्न



तुम्हालाही पडला असेल. चला तर पाहूयात यामुळे नेमके काय होते.

आतापर्यंत कांदा हा आपण जेवणातच वापरला आहे. पावसाळ्याचे आगमन होताच वातावरणात थंडावा निर्माण होतो. उन्हापासून काहीसा दिलासा मिळतो. या दिवसात कांद्याची भजी खाण्याचा मोह कोणाला आवरत नाही. काहीजण वर्षभर पुरेल इतका कांदा एकदाच खरेदी करून साठवून ठेवतात. अशावेळी या साठवून ठेवलेल्या कांद्याची योग्य ती काळजी घेतली नाही, तर तो पावसाच्या ओलाव्याने खराब होतो. कांदा व्यवस्थित साठवून ठेवल्यास महिनाभर आरामात टिकतो. अन्यथा कांद्याला बुरशी लागते. ओलाव्यामुळे इतर कांदेही खराब होतात. यासाठीच या गृहिणीने हा हटके जुगाड सांगितला आहे.

पावसाळ्यात कांदा भजी आणि चहाला घरोघरी मागणी असते. हेच ओळखून कांद्याचे भाव वाढू लागतात. म्हणून हुशार गृहिणी कांदा आधीच खरेदी करून ठेवतात आणि पूर्ण वाळवून त्याची साठवणूक करतात. ही पूर्वतयारी तुम्ही केली नसेल तर काळजी करू नका. गरजेप्रमाणे कांदा विकत आणा आणि तो खराब होऊ नये यासाठी पुढे दिलेले उपाय करा.

पावसाळ्यामुळे आपण एकत्र कांदे घेऊन ठेवतो. मात्र, कांदे साठवून ठेवल्यास त्याला पाणी सुटते आणि ते खराब होतात. मात्र, पेपर वापरल्यास हे कांदे अगदी सहा महिने खराब होणार नाही. या पेपरमुळे कांद्याचे संपूर्ण पाणी शोषून घेतले जाते आणि कांदे सुके राहतात. या व्हिडिओमध्ये तुम्ही पाहू शकता या महिलेने सगळे कांदे का पेपरवर पसरवले आहेत आणि नंतर पॅक केले आहेत. तुम्हीही पावसाळ्यात एकत्र घेतलेले कांदे अशाप्रकारे साठवून ठेवू शकता. पावसाळ्यातील आर्द्र वातावरणामुळे कांद्याला कोंब फुटतात. यासाठी कांदा खरेदी केल्यानंतर कागदावर पसरवा. कागद जास्तीची आर्द्रता शोषून घेईल. ज्यामुळे कांद्याला कोंब फुटणार नाही आणि दीर्घकाळ चांगले टिकतील.

# प्राजक्ता माळी झाली व्हिगन!

## व्हिगन म्हणजे नेमके काय? शाकाहार व व्हिगन आहारात फरक काय? जाणून घ्या...



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मराठी कलाविश्वाची लाडकी अभिनेत्री प्राजक्ता माळीने नुकतीच सोशल मीडियावर पोस्ट करत स्वतः व्हिगन झाल्याचे जाहीर केले आहे. रितेश देशमुख, जिनिलिया देशमुख, विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांसारख्या दिग्गज सेलिब्रिटींनंतर आता प्राजक्तानेही हा मार्ग निवडल्याने व्हिगन जीवनशैलीची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे. व्हिगन म्हणजे वनस्पतींवर आधारित असा आहार, ज्यामध्ये मांस, अंडी, मासे याबरोबरच प्राण्यांपासून मिळणारे सर्व पदार्थ पूर्णपणे टाळले जातात. व्हिगन म्हणजे नेमके काय? शाकाहार व व्हिगन यात काय फरक असतो? व्हिगन होण्यामागची कारणं कोणती? याबद्दल जाणून घेऊया.

### प्राजक्ता माळीची पोस्ट

"आज सकाळी सिद्धिविनायक आणि आई तळजाई माता यांचे दर्शन घेतले आणि या क्षणापासून मी व्हिगन होण्याचा निर्णय घेतला आहे. मर्जीने नाही, तर सक्तीने. माझे शरीर दूध आणि दुग्धजन्य पदार्थ स्वीकारत नाही. त्यामुळे मला सतत खोकला येत होता. त्यामुळे यापुढे मी कॉफी आणि चहाला नकार दिला, आश्चर्य वाटून घेऊ नका. माझे शरीर सर्व "तामसिक" गोष्टी नाकारत आहे. त्यामुळे मी अधिकृतपणे, आतापासून क्रूरतामुक्त झाले आहे. फक्त काही खोटे बोलणाऱ्या आणि फसवणाऱ्या लोकांना वगळता," अशी पोस्ट प्राजक्ता माळीने केली आहे.

### व्हिगन म्हणजे काय?

व्हिगन म्हणजे अशी जीवनशैली किंवा आहारपद्धती, ज्यामध्ये कोणत्याही प्राण्यांपासून मिळणाऱ्या पदार्थांचा वापर पूर्णपणे टाळला जातो. व्हिगन होणे हा फक्त आहाराचा नियम नसून प्राण्यांना इजा न पोहोचवता पूर्णपणे वनस्पतींवर आधारित जीवनशैली स्वीकारणे आहे.

### व्हिगन आहारात काय टाळले जाते?

व्हिगन असणारे लोक मटण, मासे, चिकन आणि अंडी, गाई-म्हशीचे दूध, दही, ताक, तूप, लोणी, चीज, पनीर आणि मध याचे सेवन करत नाहीत. इतकेच नाही तर व्हिगन व्यक्ती लेदर कपडे/बूट, रेशीम, लोकर, तसेच ॲनिमल टेस्टिंग केलेले कॉस्मॅटिक्स वापरणे पूर्णपणे टाळतात.

### व्हिगन आहारात काय खाल्ले जाते?

सर्व प्रकारची फळे आणि भाज्या, धान्ये, कडधान्ये, सुका मेवा, वनस्पतींपासून बनवलेले दूध (सोया दूध, बदाम दूध, नारळाचे दूध, ओट्स दूध) आणि त्यापासून बनविलेले दही/चीज खाल्ले जाते. तसेच टोफू व्हिगन आहारात खाल्ले जाते.

### व्हिगन व शाकाहार यातील फरक काय?

शाकाहारी लोक मांस-मासे खात नसले तरी दूध, दही, तूप, लोणी, चीज आणि मध यांसारखे प्राण्यांपासून मिळणारे पदार्थ खातात. पण व्हिगन लोक दुग्धजन्य पदार्थांसह प्राण्यांपासून मिळणाऱ्या कोणत्याही गोष्टीचा आहारात समावेश करत नाहीत.

### सेलिब्रिटी व्हिगन लाइफस्टाइल का स्वीकारत आहेत?

फिल्म इंडस्ट्रीतील कलाकार, क्रीडा आणि ग्लॅमर जगतातील अनेक सेलिब्रिटींनी व्हिगन जीवनशैली स्वीकारली आहे, त्यामागची काही कारणे खालीलप्रमाणे-

फिटनेस : सेलिब्रिटींना त्यांच्या कामासाठी एनर्जी पाहिजे असते, त्याचबरोबर शारीरिक फिटनेस टिकवून ठेवावा लागतो. व्हिगन आहार पचायला हलका असतो, त्यामुळेही सेलिब्रिटी व्हिगन लाइफस्टाइल स्वीकारतात.

वजन नियंत्रण आणि त्वचेचे सौंदर्य : दुग्धजन्य पदार्थ बंद केल्याने त्वचेवरील पुरळ/पिंपल्स कमी होण्यास आणि चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो येण्यास मदत होते. तसेच चयापचय सुधारून वजन नियंत्रणात ठेवणे सोपे जाते.

प्राण्यांवरील प्रेम : ऑस्करविजेता जोक्विन फिनिक्स, अरियाना ग्रँडे, बॉलीवूडमधील कंगना रणौत, आमीर खान, आलिया भट्ट, जॅकलीन फर्नांडिस यांसारख्या सेलिब्रिटींनी प्राण्यांवरील प्रेम आणि पर्यावरणाविषयीची बांधिलकी यामुळे व्हिगन लाइफस्टाइल स्वीकारली आहे. आपल्या लोकप्रियतेचा वापर करून समाजात चांगला संदेश देणे हाही यामागील एक उद्देश असतो.




# श्रावण : भक्ती, साधना आणि शिवकृपेचा पवित्र काळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात श्रावण महिना अत्यंत पवित्र आणि आध्यात्मिकदृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो. या महिन्यात केलेली भक्ती, नामस्मरण, जप, ध्यान आणि सेवा मनाला शांती देणारी ठरते. श्रावण म्हणजे भगवान महादेवांची उपासना करण्याचा विशेष काळ. सोमवारी शिवलिंगावर जलाभिषेक करणे, बेलपत्र अर्पण करणे, महामृत्युंजय मंत्राचा जप करणे आणि मनोभावे शिवनामस्मरण करणे याला विशेष महत्त्व आहे.

श्रावणात निसर्गही हिरवागार होतो आणि वातावरणात एक वेगळीच सकारात्मकता जाणवते. त्यामुळे हा महिना केवळ पूजा-पाठाचा नसून, मनातील नकारात्मक विचार दूर करून स्वतःमध्ये चांगले बदल घडविण्याची संधी आहे. स्वामी समर्थांच्या शिकवणीतही नामस्मरण, श्रद्धा आणि सबुरीला विशेष स्थान आहे.
श्रावणात देवाकडे मागण्यापेक्षा मनापासून एकच प्रार्थना करा-
**"स्वामी, माझी बुद्धी शुद्ध ठेवा, मन शांत ठेवा आणि प्रत्येक संकटात योग्य मार्ग दाखवा."**
श्रावणात केलेली खरी भक्ती म्हणजे फक्त देवासमोर दिवा लावणे नाही; तर आपल्या मनातला अंधार दूर करून दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणे होय.

**हर हर महादेव! श्री स्वामी समर्थ!**

## श्रावण महिना व सण (2026)

| | | |
|---|---|---|
| 13 ऑगस्ट | श्रावण मास प्रारंभ | (गुरुवार) |
| 17 ऑगस्ट | पहिला श्रावण सोमवार - नागपंचमी | (सोमवार) |
| 24 ऑगस्ट | दुसरा श्रावण सोमवार | (सोमवार) |
| 27 ऑगस्ट | नारळी पौर्णिमा | (गुरुवार) |
| 28 ऑगस्ट | रक्षाबंधन | (शुक्रवार) |
| 31 ऑगस्ट | तिसरा श्रावण सोमवार | (सोमवार) |
| 4 सप्टेंबर | श्री. कृष्ण जयंती | (शुक्रवार) |
| 5 सप्टेंबर | गोपाळकाला | (शनिवार) |
| 7 सप्टेंबर | चौथा श्रावण सोमवार | (सोमवार) |
| 14 सप्टेंबर | श्री. गणेश चतुर्थी | (सोमवार) |
| 19 सप्टेंबर | गौरी विसर्जन | (शनिवार) |
| 25 सप्टेंबर | अनंत चतुर्दशी | (शुक्रवार) |

|| शुभ श्रावण मासाच्या हार्दिक शुभेच्छा ||

# श्रावण सोमवारी पूजा कशी करावी? धान्याची शिवामूठ वाहण्याचा मंत्र आणि कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावणात भगवान शंकर यांची प्रार्थना, सेवा, उपासना करणे अत्यंत शुभ असते. या महिन्यात विशेषतः सोमवारी जे व्रत करतात त्याला श्रावण सोमवारचे व्रत असे म्हणतात.

### व्रत असे करावे

श्रावण सोमवारी ब्रह्म मुहूर्तावर उठावे. पूर्ण घराची स्वच्छता करावी व स्नान करावे. गंगाजल वा पवित्र पाणी घरात शिंपडावे. देवघरातील शिवलिंगाचे पूजन करावे.

पूजेची तयारी झाल्यानंतर हातात पाणी घेऊन खालील मंत्राने संकल्प करावा-
**'मम क्षेमस्थैर्य विजयारोग्यै श्वर्याभि वृद्धयर्थं सोमव्रतं करिष्ये'.**
त्यानंतर खालील मंत्राने शिवांचे ध्यान करावे-
**'ध्यायेन्नित्यंमहेशं रजतगिरिनिभं चारुचंद्रावतंसं रत्नाकल्पोज्वलांग परशुमृगवराभीतिहस्तं प्रसन्नम्। पद्मासीनं समंतात्स्तुतममरगणैर्व्याघ्रकृत्तिं वसानं विश्वाद्यं विश्ववंद्यं निखिलभयहरं पंचवक्त्रं त्रिनेत्रम्॥**
ध्यानानंतर **'ॐ नमः शिवाय'** हा मंत्र म्हणून भगवान शिवजी व माता पार्वतींची पंचोपचार किंवा षोडषोपचारे पूजा करावी. पूजेनंतर शिवामूठ अर्पण करावी.

धान्याची शिवामूठ वाहण्याचा मंत्र
**नमः शिवाय शान्ताय पंचवक्त्राय शूलिने । शृकङ्गिभृङ्गि-महाकालणयुक्ताय शम्भवे ।।'**
शिवा शिवा महादेवा... माझी शिवामूठ ईश्वरा देवा सासू- सासरा, दिरा-भावा,नणंदाजावा, भ्रतारा नावडतीची आवडती कर रे देवा,
यानंतर व्रताची कहाणी ऐकावी.त्यानंतर आरती करून प्रसाद वाटावा.फलाहार घ्यावा. संध्याकाळी व्रताचे पारने करावे. एकाजागी बसून सात्त्विक भोजन करावे.
श्रावण सोमवारी विविध धान्याच्या शिवामूठ अर्पण केल्या जातात-
१} **पहिला सोमवार :** शिवामूठ तांदूळ.
२} **दुसरा सोमवार :** शिवमूठ पांढरे तीळ.
३} **तिसरा सोमवार :** शिवमूठ मूग.
४} **चौथा सोमवार :** शिवमूठ जवस.
५} **पाचवा सोमवार :** शिवमूठ सातू

### सोमवारची शिवामुठीची कहाणी-

आटपाट नगर होते. तेथे एक राजा होता. त्या राजाला चार सुना होत्या. तीन आवडत्या होत्या, एक नावडती होती. आवडत्या सुनांचा तो चांगला प्रतिपाळ करी. नावडतीला जेवायला उष्टे, नेसायला जाडेभरडे. राहायला गुरांचे बेड दिले. गुराख्याचे काम दिले. पुढे श्रावणमास आला.
पहिला सोमवार आला. ही रानीं गेली. नागकन्या- देवकन्यांची भेट झाली. त्यांना विचारले, "बाई बाई, कुठे जाता?" " महादेवांच्या देवळी जातो, शिवामूठ वाहतो." "याने काय होते?" "भ्रताराची भक्ती होते. इच्छित कार्य सिद्धीस जाते. मुलेबाळे होतात. नावडती माणसे आवडती



होतात. वडील मनुष्यांपासून सुखप्राप्ती होते." मग त्यांनी हिला विचारले, "तू कोणाची कोण?" "मी राजाची सून, तुमच्याबरोबर येते."
त्यांच्याबरोबर देवळात गेली. नागकन्या-देवकन्या वसा वसू लागल्या. नावडती म्हणाली, "काय ग बायांनो वसा वसता?", "आम्ही शिवामुठीचा वसा वसतो."
"त्या वशाला काय करावे?" "मूठ चिमूट तांदुळ घ्यावे, शिवराई सुपारी घ्यावी, गंध फूल घ्यावे, दोन बेलाची पाने घ्यावी. मनोभावे पूजा करावी. हाती तांदूळ घ्यावे आणि तोंडाने "शिवा शिवा महादेवा, माझी शिवामूठ ईश्वरा देवा. सासूसासऱ्या, दिराभावा, नणंदाजावा, भ्रतारा, नावडती आहे ती आवडती कर रे देवा." असे म्हणून तांदूळ वाहावेत. सायंकाळपर्यंत उपवास करावा. उष्टेमाष्टे खाऊ नये. दिवसा निजू नये. उपास नाही निभवला तर दूध प्यावे. सायंकाळी अंघोळ करावी. देवाला बेल वाहावा आणि मुकाट्याने जेवण करावे. हा वसा पाच वर्षे करावा. पहिल्या सोमवारी तांदूळ, दुसऱ्यास तीळ, तिसऱ्यास मूग, चौथ्यास जव आणि पाचवा आला तर सातू शिवामुठी करिता घेत जावे."

पहिल्या सोमवारी सगळे साहित्य नागकन्या-देवकन्यांनी दिले आणि दुसऱ्या सोमवारी हिला धरून आणायला संगितले. त्या दिवशी हिने मनोभावे पूजा केली. सारा दिवस उपास केला. जावानणंदांनी उष्टेमाष्टे पान दिले. ते तिने गाईला घातले. शंकराची आराधना केली आणि दूध पिऊन निजून राहिली. पुढे दुसरा सोमवार आला. नावडतीने घरांतून सर्व सामान मागून घेतले. पुढे रानात जाऊन नागकन्यांबरोबर मनोभावे पूजा केली आणि "शिवा शिवा महादेवा, माझी शिवामूठ ईश्वरा देवा. सासूसासऱ्या, दिराभावा, नणंदाजावा, भ्रतारा, नावडती आहे ती आवडती कर रे देवा." असे म्हणून तीळ वाहिले. सारा दिवस उपवास केला. शंकराला बेल वाहिला. दूध पिऊन निजून राहिली. सायंकाळी सासऱ्याने विचारले. "तुझा देव कुठे आहे? नावडतीने जबाब दिला, "माझा देव फार लांब आहे. वाटा कठीण आहेत, कांटेकुटे आहेत. साप-वाघ आहेत, तिथे माझा देव आहे." पुढे तिसरा सोमवार आला. पूजेचे सामान घेतले. देवाला जाऊ लागली. घरची माणसे मागे चालली. "नावडते, तुझा देव दाखव," म्हणून म्हणू लागली. नावडतीला रोजचा सराव होता. तिला काहीं वाटले नाही. यांना काटेकुटे पुष्कळ लागले. नावडतीची दया आली. आजपर्यंत रानात कशी येत असेल कोण जाणे. नावडतीला चिंता पडली. देवाची प्रार्थना केली. देवाला तिची करुणा आली. नागकन्या, देवकन्या यासह वर्तमान देऊळ सुवर्णाचे झाले. रत्नजडिताचे खांब झाले, हांड्या गलासे लागली. स्वयंभू महादेवाची पिंडी झाली. सगळ्यांनी देवाचे दर्शन घेतले. नावडाती पूजा करू लागली. गंधफूल वाहू लागली. नंतर मूग घेऊन "शिवा शिवा महादेवा, माझी शिवामूठ ईश्वरा देवा. सासूसासऱ्या, दिराभावा, नणंदाजावा, भ्रतारा, नावडती आहे ती आवडती कर रे देवा." असे म्हणून शिवाला वाहिले. राजाला मोठा आनंद झाला. नावडतीवर प्रेम वाढले. दागिने ल्यायला दिले. खुंटीवर पागोटे ठेवून तळे पाहायला गेला. नावडतीची पूजा झाली. पूजा झाल्यावर सगळी माणसे बाहेर आली. इकडे देऊळ अदृश्य झाले. राजा परत आला. माझे पागोटे देवळी राहिले देवळाकडे आणायला गेला. तो तिथे एक लहान देऊळ आहे, तिथे एक पिंडी आहे. वर आपण केलेली पूजा आहे, जवळ खुंटीवर पागोटे आहे. तेव्हा त्याने सुनेला विचारले, " हे असे कसे झाले?" "माझा गरिबाचा हाच देव. मीं देवाची प्रार्थना केली, त्याने तुम्हाला दर्शन दिले." सुनेमुळे देव भेटला म्हणून तिला पालखीत घालून घरी आणले. नावडती होती ती आवडती झाली.

जसा तिला शंकर प्रसन्न झाला, तसा तुम्हा आम्हा होवो. ही साठा उत्तरांची कहाणी. पांचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

## श्रावण सोमवारी कोणती फुले भगवान शिवांना अर्पण करू नयेत?

श्रावण सोमवारी भगवान शिवांची पूजा करताना त्यांना प्रिय असलेली पांढरी फुले, बेलपत्र आणि धोतरा अर्पण केला जातो. परंतु धार्मिक ग्रंथांनुसार आणि मान्यतेनुसार काही फुले भगवान शिवजींना अर्पण करणे वर्ज्य (निषिद्ध) मानले गेले आहे. चला, श्रावण सोमवारी महादेवांना कोणती फुले अर्पण करू नयेत याबद्दल सविस्तर जाणून घेऊ.

### वर्ज्य असलेली फुले आणि कारणे

**केतकी (केवडा) :** पौराणिक कथेनुसार भगवान ब्रह्मा आणि भगवान विष्णू यांच्यातील श्रेष्ठत्वाच्या वादात केतकीच्या फुलाने ब्रह्मदेवांना खोटी साक्ष देण्यासाठी मदत केली होती. या असत्य भाषणामुळे भगवान शिवजींनी केतकीच्या फुलाला आपल्या पूजेतून कायमचे वर्ज्य केले.
**केवडा आणि चंपा :** या फुलांचा तीव्र सुवास आणि काही धार्मिक पौराणिक कथांमुळे ही फुले महादेवांच्या पूजेत वापरली जात नाहीत.
**कनेर (पिवळी/तांबडी कनेर) आणि कणेर :** शिवपुराणानुसार भगवान शिवजींना लाल किंवा विशिष्ट उग्र वासाची फुले अर्पण करणे टाळावे.
**कनेरऐवजी जास्वंद (लाल फुले) :** लाल रंगाची फुले (उदा.- जास्वंद/गुढल) प्रामुख्याने देवी आणि गणपती बाप्पांना प्रिय असतात. महादेवांना लाल रंगाची फुले अर्पण करणे टाळावे.
**कुंद आणि मालतीचे फूल :** ही फुलेदेखील शिवपूजेत निषिद्ध मानली जातात.
**तुळशीची पाने किंवा मंजिरी :** जरी हे फूल नसले तरी पूजेच्या ताटात तुळशीची पाने शिवजींना अर्पण करू नयेत. (जालंधर राक्षसाच्या कथेमुळे शिवजींना तुळस वाहिली जात नाही).

### इतर काही महत्त्वाचे नियम

**कळ्या अर्पण करू नयेत :** महादेवांना पूर्ण उमललेलीच फुले वाहावीत, कळ्या अर्पण करू नयेत.
**शिळी किंवा सुकलेली फुले :** देवाला नेहमी ताजी फुले अर्पण करावीत. सुकलेली किंवा किडलेली फुले वाहू नयेत.
**जमिनीवर पडलेली फुले :** झाडावरून गळून जमिनीवर पडलेली फुले उचलून शिवाला वाहू नयेत.

### महादेवांना कोणती फुले अत्यंत प्रिय?

शिवपूजेत धोतऱ्याचे फूल, मंदार (रुईचे फूल), आकड्याचे फूल, पांढरी कणेर, जाई-जुई आणि पांढरी कमळ अर्पण करणे अत्यंत शुभ मानले जाते.



## श्रावणात महादेवांना बेलपत्र वाहण्याचे महत्त्व!

श्रावण महिना हा भगवान महादेव यांच्या उपासनेसाठी अत्यंत पवित्र मानला जातो. या महिन्यात महादेवांना बेलपत्र वाहण्याला विशेष धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे.

### बेलपत्राचे धार्मिक महत्त्व

**त्रिदेव आणि त्रिगुणांचे प्रतीक :** बेलपत्राची तीन पाने त्रिदेव (ब्रह्मा, विष्णू आणि महेश) यांचे प्रतीक मानली जातात. तसेच ती सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांचे प्रतिनिधित्व करतात.
**महादेवाची त्रिनेत्रे :** बेलपत्राच्या तीन पानांना भगवान शिवाचे तीन डोळे (त्रिनेत्र) मानले जाते.
**पापांचा नाश :** असे मानले जाते, की महादेवाला भक्तीभावाने अर्पण केलेले एक बेलपत्र जन्मांतराच्या पापांचा नाश करते.

### पौराणिक कथा (समुद्रमंथनाचा प्रसंग)

पौराणिक कथेनुसार समुद्रमंथनातून जेव्हा अत्यंत विषारी 'हलाहल' विष बाहेर पडले, तेव्हा सृष्टीच्या रक्षणासाठी भगवान शिवाने ते प्राशन केले. विषामुळे त्यांच्या शरीराचा दाह (जळजळ) होऊ लागला आणि तापमान वाढले. त्यावेळी सर्व देवतांनी महादेवांच्या शरीराचा दाह कमी करण्यासाठी त्यांच्या शिरावर थंड पाणी, दूध आणि थंड गुणधर्म असलेले बेलपत्र वाहिले. बेलपत्राच्या थंड प्रभावामुळे महादेवांच्या शरीरातील जळजळ शांत झाली. तेव्हापासून महादेवाला प्रसन्न करण्यासाठी आणि त्यांचा आशीर्वाद मिळवण्यासाठी बेलपत्र अर्पण करण्याची परंपरा सुरू झाली.

### आयुर्वेदाच्या दृष्टीने महत्त्व

शास्त्रानुसार श्रावण महिन्यात वातावरणात भरपूर आर्द्रता आणि बुरशीजन्य संसर्ग असतो. बेलपत्र हे एक उत्तम औषधी वृक्ष आहे.
बेलपत्रात त्रिदोष (वात, पित्त आणि कफ) शांत करण्याचे गुणधर्म असतात. हे अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-फंगल असून शरीरातील उष्णता कमी करण्यास मदत करते.

### नियम व पद्धत (बेलपत्र वाहताना काय काळजी घ्यावी?

१) **कसे वाहावे :** बेलपत्र वाहताना नेहमी त्याची गुळगुळीत/चकाकणारी बाजू शिवलिंगाला स्पर्श करेल अशा पद्धतीने उलटे वाहावे.
२) **अखंड असावे :** बेलपत्र कुठेही फाटलेले, कापलेले किंवा किडलेले नसावे. ते नेहमी तीन पानांचेच (त्रिदल) असावे.
३) **अनामिका बोटाने अर्पण करा:** बेलपत्राचा देठ (अंगठा, अनामिका आणि मधले बोट) धरून महादेवाला 'ॐ नमः शिवाय' किंवा 'महामृत्युंजय मंत्र' म्हणत अर्पण करावे.
४) **पुनर्वापर शक्य :** जर नवीन बेलपत्र उपलब्ध नसेल, तर आधी वाहिलेले बेलपत्र स्वच्छ पाण्याने धुवून पुन्हा महादेवाला अर्पण केले जाऊ शकते (कारण बेलपत्र कधीही शिळे किंवा अशुद्ध होत नाही).

# कोण आहे जिवती? श्रावणात कशी कराल जिवतीची पूजा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रावण मासाचा गुरुवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारंभ होत आहे. या अनुषंगाने शहरांमध्ये हल्ली बहुतांश घरांमध्ये जिवती पूजन बंद झालेले दिसते. अनेकांना माहितीही नाही की हर काय असते?

**कोण आहे जिवती? हिच्या पूजनाचा हेतू काय?**

आषाढ महिन्याच्या अमावास्येला दीपपूजन केले जाते. याच दिवशी काहीअंशी जिवंतिका पूजन करतात. दिवा हे ज्ञानाचे, वृद्धींगतेचे प्रतीक आहे. अज्ञानाचा नाश करून ज्ञानाकडे जाणाऱ्या मार्गाचा मुख्य आधार आहे दीप. तुम्ही एक दिवा उजळा त्यावरून तुम्ही हजारो दिवे उजळू शकता. त्यामुळेच याला वंश वृद्धीचे प्रतीक मानतात. या प्रतीकाचे पूजन म्हणजेच दीपपूजन.

**दुसरी पूज्य देवता म्हणजे जिवती**

जिवतीची प्रतिमेच्या रूपात पूजा केली जाते. संपूर्ण श्रावण महिना या प्रतिमेचे पूजन मातृशक्तीकडून केले जाऊन आपल्या अपत्यांच्या मंगलतेची प्रार्थना केली जाते. ही प्रतिमा विशेष अर्थपूर्ण आहे. या एकाच प्रतिमेत चार वेगवेगळ्या देवतांच्या, वरवर पाहता परस्परांशी संबंध नसलेल्या स्वतंत्र प्रतिमा आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात याच प्रतिमेचे पूजन केले जाते. यातील एकही प्रतिमा बदललेली दिसत नाही. काय रहस्य असेल या प्रतिमा क्रमाचे?
जिवती प्रतिमेत प्रथम नरसिंह, नंतर कालियामर्दन करणारे भगवान कृष्ण, मध्यभागी मुलांना खेळविणाऱ्या जरा-जिवंतिका आणि सगळ्यात खाली बुध-बृहस्पती (गुरू) यांचा समावेश असतो. याच क्रमात त्यांना पुजले जाते. त्याची कारणमीमांसा...

**प्रथम भगवान नरसिंहच का?**

भगवान विष्णूंचा चौथा अवतार असलेले भगवान नरसिंह किंवा नृसिंह आपल्या बाळ भक्तासाठी प्रगट झाले. ही कथा आपल्या सर्वांना परिचयाची आहे. बाळ प्रल्हादाचे हिरण्यकशिपूपासून म्हणजेच दैत्यांपासून रक्षण करणे याच मूळ उद्देशाने भगवंताने हा अवतार धारण केला. बालकांचा रक्षक आणि बालभक्तासाठी अवतार धारण केलेली देवता म्हणून भगवान नरसिंह या प्रतिमेत पुजले जातात. म्हणजेच...नरसिंह घरात ओढवणाऱ्या आपत्तीपासून बाळाचा बचाव करतात. जसे- उंचावरून पडणे, अन्नातून कधी विषबाधा होणे, आगीपासून होणारी हानी इत्यादी.

**कालियामर्दन करणारा श्रीकृष्ण**

नाग आणि गोपाळकृष्ण दोन्हीही श्रावणातील आराध्य दैवत. मग नाग प्रतिमा वेगळी आणि कृष्ण प्रतिमा वेगळी न देता कालियामर्दन करणारे श्रीकृष्णच का? आपण जर कालियामर्दन प्रसंगाचा विचार केला तर लक्षात येईल की या




प्रसंगात भगवान कृष्ण आणि त्यांचे मित्र खेळत असताना त्यांचा चेंडू यमुनेच्या डोहात गेला आणि भगवान कृष्णांनी तो परत आणला. खेळणाऱ्या-बागडणाऱ्या मुलांवर आलेला वाईट प्रसंग भगवान कृष्णांनी दूर केला. तसेच कालियाला न मारता त्यांनाही अभय देऊन दूर जाण्याचा आदेश दिला. नाग हा सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये मुख्य. सरपटणाऱ्या प्राण्यांपासून वाचवणारे, त्याचबरोबर महत्त्वाच्या प्राण्यांना अभय देणारे, खेळात बागडत असताना बालकांवर आलेल्या वाईट प्रसंगातून वाचवणारे भगवान कृष्ण येथे कालियामर्दन रूपात पुजले जातात. म्हणजेच... कालियादमनक कृष्ण बाहेरच्या आपत्तीपासून जसे खेळतांना येणाऱ्या आपत्ती, पाण्यापासूनचे संकट, सरपटणाऱ्या प्राण्यांचे भय इत्यादींपासून बचाव करतात. घरात आणि घराबाहेर बाळांवर येणाऱ्या संकटांपासून हे दोन्हीदेव बालकांचे रक्षण करतात म्हणून जिवती प्रतिमेत त्यांचे प्रथम स्थान.

**जरा व जिवंतिका**

जरा व जिवंतिका या यक्ष गणातील देवता. जरा या यक्षिणीबद्दल महाभारतात एक कथा येते. मगधनरेश बृहद्रथ याला दोन राण्या असतात. दोन्हीही राण्यांवर त्याचे सारखेच प्रेम असते. परंतु राजाला पुत्र/ पुत्री काहीही नसल्यामुळे राजा चिंतीत असतो. याच सुमारास नगरजवळील उपवनात ऋषी चंडकौशिक आल्याचे राजाला समजते. राजा त्यांचे दर्शन घेऊन आपली चिंता प्रगट करतो. ऋषी राजाला प्रसादात आंबा देतात व राणीला खायला द्या म्हणून सांगतात. दोन्ही राण्यांवर समान प्रेम असल्यामुळे राजा आंब्याचे समान भाग करून राण्यांना देतो. कालांतराने दोन्ही राण्यांना पुत्र होतो परंतु केवळ अर्धा- अर्धा. अशा विचित्र आणि अर्धवट अभ्राकांना राजा जंगलात नेऊन टाकतो. त्याच वेळेस तेथून जरा नामक यक्षिणी जात असते. ती दोन्ही अभ्रक तुकड्यांना हातात घेते आणि आपल्या अवयव सांधण्याच्या कलेने दोनीही शकलं सांधते. जरा ते सांधलेले अभ्रक संध्यासमयास बृहद्रथ राजाला आणून देते. जरा यक्षिणीने सांधले म्हणून राजा त्याचे नाव जरासंघ ठेवतो आणि जरा यक्षिणीच्या उपकाराप्रीत्यर्थ नगरात देऊळ बांधून तिला मगधाच्या इष्टदेवतेचा मन देतो. त्याच प्रमाणे जारदेवतेचा वार्षिक महोत्सव सुरु करतो, अशी हि जरा देवी. जारेंचीच सखी जिवंतिका. जिवंतिका या शब्दाचा अपभ्रंश जिवती. जिवंतिकेचा अर्थ होतो दीर्घायू प्रदान करणारी. बालकाच्या दीर्घायुष्याची कामना करून या देवीची पूजा करतात. ही देवी पाळण्यात व आजूबाजूंनी बालकांना खेळवतो अशा रूपात दाखवितात.

**बुध व बृहस्पती**

बुध ग्रह हत्तीवर बसलेला असून हाती अंकुश धारण करतो. तर बृहस्पती (गुरू) वाघावर बसलेला आणि हातात चाबूक घेतलेला दाखवतात. बुधाच्या प्रभावाने जातकाला अलौकिक बुद्धिमत्ता, आकर्षक व्यक्तिमत्त्व, वाक्पटुत्व इत्यादी गुण प्राप्त होतात. तर बृहस्पतीच्या प्रभावाने शैक्षणिक प्रगती, अध्यात्मिक उन्नती, विवेकबुद्धी जागृत होते.

**बुधाचे वाहन हत्ती**

हत्ती हे उन्मत्ततेचे प्रतीक आहे. मानवी मनाला येणारी उन्मत्तता आपल्या बुद्धिमत्तेने, व्यक्तित्वाचा अंकुश घालून आवर घालावा हे बुध प्रतिमेवरून लक्षात येते.

**बृहस्पतीचे वाहन वाघ**

हे अहंकाराचा प्रतीक आहे. मानवी मनाला अहंकार लवकर चिटकतो. अहंकार मानवाच्या सर्व प्रकारच्या प्रगतीमध्ये व आध्यात्मिक साधनेतही बाधक ठरतो. त्यावर आपण ज्ञानाच्या, गुरुकृपेच्या आशीर्वादाने ताबा मिळवावा, हे बृहस्पती प्रतिमा आपल्याला शिकवते. म्हणूनच बुध-बृहस्पती यांना सुद्धा जिवती प्रतिमेत स्थान मिळाले. प्रथम रक्षक देवता. नंतर जन्मलेल्या बालकाचे रक्षण व दीर्घायुष्य देणारी देवता आणि नंतर व्यक्तिमत्व प्रभावित करणारी ग्रहदेवता असा हा जिवती प्रतिमेचा क्रम. एका मातृशक्तीने दुसऱ्या रक्षक व पालक शक्तीचे केलेले पूजन म्हणजेच जिवती पूजन. जगातील सर्व प्राणिमात्रांच्या उज्ज्वल भविष्याची, रक्षणाची प्रार्थना...म्हणजेच जिवती पूजन.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)**